**MHKO120000132015**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७/२०१५</u>**
(CNR No.MHKO120000132015)

## <u>निशाणी क्र.९५ खाली आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज प्रतिवादी क्र.११ विरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ कलम ९४ व १५१ अन्वये तूर्तातूर्त मनाईकरीता दाखल केला आहे.

**<u>दावा मिळकतींचे वर्णन</u> :-**

(अ) मौजे तांबाळे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील वादीचे वडिलार्जित एकत्र हिंदु ख्रिश्चन कुटुंबियाची अविभक्त गट क्र.११८ सिदोबाचा नंबर या नावाने ओळखणारी शेत जमिनी त्याचे क्षेत्र हे ०-३३ आर, पो.ख. ०-०६ असे एकुण ०-३९ आर त्यासी आकार रु. ०-२५ पैसे पुर्ण गट क्रमांक.

(ब) ग्रामपंचायत तांबाळे येथील बाजारपेठ ग्रामपंचायत मिळकत क्र.१४७/1, १४७/२, व १४७/३ चे वादी प्रतिवादी क्र.१ ते ५ चे वाडवडिलार्जित एकत्र कुटुंबाचे घर मिळकती.

(क) प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे नांवे तथाकथित पोकळ, बनावट बिन कब्जाचे व बिन भरण्याचे करुन दिलेले रजिस्टर खरेदीखत क्र.१६१५ दि.१३/११/२०१४ चे खरेदीखत.

(ड) प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेकडुन फसवून करुन घेतलेले तथाकथित खोटे बनावट बेकायदेशिर पोकळ व बिनकब्जाचे रजिस्टर खरेदीखत क्र.१०३/२००८ दि.२४/०१/२००८ चे खरेदीखत.

(इ) प्रतिवादी क्र.९ व १० यांनी प्रतिवादी क्र.११ यांना दावा प्रलंबित आहे याची माहिती असतानाही महाराष्ट्र तुकडेजोड तुकडे बंदी कायद्यातील व अन्य तरतुदीतील कलमाचा

भंग करुन खोटे बनावट व बेकायदेशिर आणि बिनकब्जाचे पोकळीस्त व कागदोपत्री करुन दिले रजिस्टर खरेदीपत्र क्र.९१७/२०२२ दि.१७/०५/२०२२ चे खरेदीखत.

(येणेप्रमाणे वर्णनाची (अ) ते (इ) मध्ये नमुद केलेल्या मिळकतींना व दस्तांना सोयीसाठी यापुढे **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात आले आहे. )

<u>वादी यांचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u> -

०२. प्रतिवादी क्र.१ आगोस्टीन हे वादी क्र.१ व ३ यांचे वडिल, वादी क्र.२ चे पती व प्रतिवादी क्र.२ ते ५ यांचे भाऊ आहेत. मुळ पुरुष मार्यान अन्तोन बारदेसकर (परेरा) हे प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे वडिल आहेत. ते सन १९८१-८२ मध्ये मयत झाले. त्यांना प्रतिवादी क्र.१ ते ५ हे वारस आहेत. दावा मिळकत १(अ) व १(ब) या मिळकती वादी क्र.१ व ३ आणि प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या वाडवडिलार्जित एकत्र कुटुंबाची मिळकती होती व आहे. या मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी यांचेत सरस निरस मानाने वाटप विभाजन झालेले नव्हते व नाही. परंतू केवळ ७/१२ पत्रकी व घरठाणपत्रकी सोईसाठी वादी क्र.१ व ३ चे वडिल व प्रतिवादी क्र.२ व ३ यांची नांवे आणेवारीने लागलेली आहेत आणि सर्वजण समाईकात सदर मिळकती उपभोगत होते व आहेत. वादीचे वडिलांना आपले हित/अनहित समजत नाही. दावा मिळकत १(अ) व १(ब) मध्ये वादी क्र.१ व ३ यांचा अविभक्त प्रत्येकी १/३ हिस्सा होता व आहे.

०३. असे असताना वादींचे एकत्र कुटुंबाला कोणतीही कायदेशिर गरज नसताना प्रतिवादी क्र.६ ने वादींचे अपरोक्ष दावा गट क्र.११८ ही तुकडा म्हणुन नोंद असताना ती प्रतिवादी क्र.१ ला फसवुन व मुंबई तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याचे कलम ७, ८, ९, ३१ व अन्य तरतुदींविरुध्द खरेदी करुन घेतले व प्रतिवादी क्र.७ व ८ चे नांवे बेकायदेशिर खरेदीदस्त क्र.१६१५/२०१४ दि.१३/११/२०१४ करुन दिलेचे वादींना नुकतेच समजुन आले आहे. सदरचे दोन्ही खरेदीपत्र वादींचे १/३ हिस्सेवर बंधनकारक नाहीत. वादी हे सहदायक (Co-parcener) असुन त्यांना कायद्याने सदर क्षेत्र अग्रहक्काने खरेदी घेणेचा हक्क व अधिकार होता व आहे.

०४. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी असले प्रतिवादी क्र.६ चे नावाचा गैरफायदा घेवुन दावा मिळकत गट क्र.११८ मधील ०.०२ आर क्षेत्र खरेदीपत्र क्र.१४९९/२०२० दि.१०/११/२०२० प्रमाणे प्रतिवादी क्र.९ व १० यांना विक्री केले आहे. त्यानंतर दि.१३/०२/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.९ व १० हे दावा मिळकतीमध्ये येवुन वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु लागले व दावा मिळकत त्रयस्थांना विक्री करणार असल्याचे बोलु लागले.

०५. सदरचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.९ व १० यांनी बेकायदेशिरपणे खरेदी केलेल्या क्षेत्रामधील प्रत्येक १ आर प्रमाणे २ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.११ यांना विक्री केले आहे. सदरचे खरेदीपत्र वादीचे हिस्सेवर बंधनकारक नव्हते व नाही. वादी हे सहदायक (Co-parcener) असुन त्यांना कायद्याने सदर क्षेत्र अग्रहक्काने खरेदी घेणेचा हक्क व अधिकार होता व आहे.

०६. वादींनी सदरचे व्यवहाराबाबत दि.२५/११/२०१४ रोजी गांवकामगार तलाठी व तहसिलदार, भुदरगड यांचेकडे रजिस्टर पोस्टाने फेरफार नोटीशीस हरकत घेतली व प्रतिवादी क्र.१ व ६ ते ८ यांना दि.१४/१२/२०१४ रोजी विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. प्रतिवादी क्र.११ ने दावा मिळकतीत कायमस्वरुपी कठडा बांधकाम व इतर बांधकाम करणेचे ठरवुन दि.२४/११/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.३ ला लेखी नोटीस पाठवली. सबब वादींनी दि.१४/१२/२०१४ रोजी व दि.२४/११/२०२२ रोजी आपला हिस्सा वाटप करुन मागितला असता त्यास प्रतिवादींनी नकार दिला व धमकी दिली. सबब मुळ दावेचे अंतिम निकालापावेतो प्रतिवादी क्र.११ यांनी स्वतः अगर तर्फे इसमांमार्फत वादींच्या दावा मिळकत १(अ) मधील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा अगर बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करु नये, दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये, त्यातील झाडे तोडु नयेत व दावा मिळकत इतर कोणासही खरेदी विक्री, दान, गहाण करु नये व दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल होईल असे कोणतही कृत्य करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाई आदेश होणेची विनंती वादींनी केली.

०७. प्रतिवादी क्र.११ यांनी निशाणी क्र.१०५ वर वादीच्या दाव्यास कैफियत व तूर्तातूर्त मनाई अर्जास म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. थोडक्यात प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, 'सर्व वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ हे हिंदु ख्रिश्चन आहेत' हा वादींनी नमुद केलेला मजकुर चुकीचा व मोघम स्वरुपाचा आहे. ख्रिश्चन वारसा कायद्यामध्ये किंवा भारतीय ख्रिश्चन धर्मियांकरीता लागु असलेल्या भारतीय वारसा अधिनियम १९२५ मध्ये वडिलार्जित मिळकत, स्वकष्टार्जित मिळकत, एकत्र कुटुंब पध्दत अशा संकल्पना अस्तित्वात नाहीत. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे नावाची नोंद दावा मिळकत गट क्र.११८ चे ७/१२ पत्रकी स्वतंत्र आणेवारीने त्यावेळच्या त्यांचे दरम्यान झाले वाटाघाटीनुसार कायदेशिररित्या झाली आहे, त्याबाबत त्यांचे दरम्यान आजतागायत कोणताही वाद नाही. त्या नोंदीप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ हे आपापल्या मिळकती स्वतंत्ररित्या उपभोगत होते व आहेत. प्रतिवादी क्र.१ हे हयात असलेने भारतीय वारसा कायद्यातील तरतुदीनुसार वादींना दावा मिळकतीमध्ये कोणतेही कायदेशिर हक्क व अधिकार प्राप्त नाहीत.

०८. दावा मिळकत गट क्र.११८ या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी अलाहिदा सरसनिरस मानाने वाटप करुन घेवुन दावा मिळकतीमधील राहती घरे आपापल्या नावावर करुन गट क्र.११८ मधील उर्वरीत क्षेत्राचे समान वाटप करुन घेवुन त्यानुसार पुर्वेकडील मठगाव रोड कडील ११ गुंठे क्षेत्र प्रतिवादी क्र.३ यांचे हिस्सेस, त्याचे पश्चिमेस प्रतिवादी क्र.२ यांना ११ गुंठे क्षेत्र व त्यांचे पश्चिमेकडील ११ गुंठे क्षेत्र हे प्रतिवादी क्र.१ चे हिस्सेस मिळाले असुन त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांची सन ११९० पुर्वीपासुन कब्जेवहिवाट चालु आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे दरम्यान वाटपाबाबत कोणत्याही प्रकारचा वाद नाही. प्रतिवादी क्र.१ चे नांवे असलेली मिळकत ही भारतीय वारसा कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्यांचे पुर्ण मालकी हक्काची मिळकत असलेने सदर मिळकत तबदील करणेचा प्रतिवादी क्र.१ यांना पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार प्राप्त होता व आहे, त्याच अधिकारान्वये प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे कौटुंबिक गरजेकरीता दावा मिळकत गट क्र.११८ मधील त्यांचे हिस्सेचे एकुण हे ०.११ आर क्षेत्रापैकी केवळ हे ०.०४ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.६ यांना पुर्ण मोबदल्यात दि.२४/०१/२००८ रोजी रजिस्टर खरेदी दस्त क्र.१०३/२००८ ने पुर्ण मालकी हक्काने विक्री केले आहे. सदरचे खरेदीपत्र हे मालमत्ता हस्तांतर कायद्यातील तरतुदीप्रमाणे योग्य

व कायदेशिर असुन सदर खरेदीपत्रास वादींची संमती घेणेचे कोणतेही कारण नाही. सदर खरेदीपत्रास सुधारित तुकडेबंदी तुकडे जोड कायद्यातील तरतुदींची कोणतीही बाधा येत नाही.

०९. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेकडुन खरेदी केलेल्या क्षेत्रापैकी पुर्वेकडील हे ०.०२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.७ व ८ यांना दि.१३/११/२०१४ चे खरेदी दस्त क्र.१६१५/२०१४ ने विक्री केले आहे. वादी हे दावा मिळकत गट क्र.११८ चे सहदायक (Co-parcener) नाहीत. त्याकारणाने प्रतिवादी क्र.७ व ८ तसेच प्रतिवादी क्र.११ यांनी खरेदी केलेले क्षेत्र खरेदी करणेचा अग्रहक्क वादींना प्राप्त नाही.

१०. प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.७ व ८ यांना विक्री केलेले क्षेत्र वजा जाता उर्वरीत पश्चिमेकडील हे ०.०२ आर क्षेत्र दि.१०/११/२०२० रोजी प्रतिवादी क्र.९ व १० यांना रजिस्टर खरेदी दस्त क्र.१४९९/२०२० ने पुर्ण मोबदल्यात खरेदी दिले आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.९ व १० यांची दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक म्हणुन नोंद झाली आहे. प्रतिवादी क्र.९ व १० यांनी त्यांचे कायदेशिर गरजेपोटी दावा मिळकतीमधील त्यांनी खरेदी केलेले हे ०.०२ आर क्षेत्र प्रतिवादी क्र.११ यांना पुर्ण मोबदल्यात खरेदी दिले असुन त्यामध्ये प्रतिवादी क्र.११ ची मालकी हक्काची कायदेशिर कब्जेवहिवाट अखंडपणे चालु आहे.

११. प्रतिवादी क्र.१ ला आपल्या हयातीत ख्रिश्चन वारसा कायद्याने स्थावर जंगम मालमत्तेची विल्हेवाट लावणेचा अधिकार आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना हिंदु वारसा कायद्यातील तरतुदी लागु होणार नाहीत किंवा त्या अंतर्गत कोणत्याही दादी वादींना मागता येणार नाहीत. वादींनी प्रतिवादी क्र.३ व गावातील लोकांचे विचाराने प्रतिवादी क्र.११ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने व प्रतिवादी यांना खरेदी केलेल्या क्षेत्रात वहिवाट करु न देण्याचे उद्देशाने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला असुन प्रस्तुत अर्ज दाखल केला असलेने तो नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

१२. वादीतर्फे विधिज्ञ श्री .एस.डी.भोसले तसेच प्रतिवादी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.सोरटे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता,

खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी केस सिद्ध करतात काय ? | : | नकारार्थी. |
| २. | सोईचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | : | नकारार्थी. |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अतोनात नुकसान होईल काय ? | : | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

१३. वादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने निशाणी क्र.१०९ वर वादी क्र.१ - वॉल्टर ऑगस्टीन परेरा यांचे ॲफिडेव्हीट, निशाणी क्र.११० वर साक्षीदार - सालू जोसेफ डिसोझा यांचे ॲफिडेव्हिट, निशाणी क्र.१११ वर साक्षीदार - रोनल तमास पिंटो यांचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे.


१४. प्रतिवादी क्र.११ यांनी प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने निशाणी क्र.११६ सोबत मौजे तांबाळे, ता. भुदरगड येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.१४७/१, २११, २१२, २१३, १४८/२ च्या असेसमेंट उता-यांची सही शिक्का नक्कल, दावा मिळकतीमधील प्रतिवादी क्र.११ यांनी प्रतिवादी क्र.३ यांचेकडुन लिहुन घेतलेले भाडे करारपत्राची छायांकित प्रत, दावा मिळकतीचे सद्य स्थिती दर्शविणारे फोटो, साक्षीदार - मार्यान अँथोनी भुतेलो व अंतोन सालू परेरा यांचे ॲफिडेव्हीट, दावा मिळकतीमधील मेडीकल संदर्भात प्रतिवादी क्र.११ यांनी केलेले भागीदारी करारपत्राची छायांकित प्रत, ग्रामपंचायत तांबाळे यांनी दावा मिळकतीबाबत दिलेल्या दाखल्याची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

## <u>प्रश्नबिंदु क्रमांक १ ते ४ करिता</u> -

## ( प्रथमदर्शनी केस, सोईचा समतोल, अपरिमित नुकसान व आदेश )

१५. प्रश्नबिंदु क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर मुद्दे चर्चेकरीता एकत्रित विचारात घेणेत आलेले आहेत.

१६. वादींतर्फे विधिज्ञ श्री .एस.डी.भोसले व प्रतिवादी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.सोरटे यांचा युक्तीवाद ऐकला. मुख्यपणे प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यामध्ये वाटप झालेले आहे का ? हा प्रश्न आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ने करुन दिलेले खरेदीखत हे तुकडेबंदी कायद्याच्या विरोधी आहेत का ? हे पाहणेसुध्दा महत्वाचे आहे. मान्य परिस्थितीनुसार, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ हे ख्रिश्चन कुटुंबिय आहेत, त्यामुळे त्यांचे वाटप हे भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम २९ ते ४६ अन्वये होणार आहे. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यामधील वाटपाबाबत निर्माण झालेल्या प्रश्नासंदर्भात खालील वंशावळ तक्ता पाहणे गरजेचे आहे.




१७. भारतीय वारसा कायदा कलम ३२ नुसार ख्रिश्चन धर्मीय कुटुंबामध्ये जर मुळ पुरुषाने मिळकत हस्तांतर करण्याबाबत कोणताही दस्त केला नसेल तर त्याच्या निधनानंतर त्याची मिळकत खालील तीन व्यक्तींमध्ये वाटप केली जाते.

१. पत्नी किंवा

२. पती किंवा

३. नातेवाईक

मान्य परिस्थितीनुसार, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या वडिलांनी म्हणजेच मार्यान बारदेस्कर यांनी आपली मिळकत हस्तांतर करण्याबाबत हयात असताना कोणताही दस्त केलेला नाही. त्यामुळे त्यांची मिळकत कायद्याचे कलम ३२ अन्वये वाटप होईल. ख्रिश्चन धर्मीयांची मिळकत ही हिंदु एकत्र कुटुंबाची वडिलार्जित मिळकत होवु शकत नाही. मान्य परिस्थितीनुसार, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे वडिल सन १९८१-८२ मध्ये मयत झालेले आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या कुटुंबाचे वाटप हे सन १९८१-८२ मध्ये खुले होणार आहे.

१८. कायद्याचे कलम ३३ अन्वये मिळकतींचे वाटप खालीलप्रमाणे होते.

१. जर फक्त पत्नी/पती हयात असेल तर संपुर्ण हिस्सा पत्नी/पतीला जातो.

२. पत्नी/पती व अपत्ये हयात असतील तर पत्नीला/पतीला १/३ हिस्सा व अपत्यांना २/३ हिस्सा मिळतो.

३. पत्नी/पती हयात असेल व अपत्ये हयात नसतील, तसेच नातेवाईक हयात असतील तर पती/पत्नी यांना १/२ हिस्सा मिळतो व नातेवाईकांना १/२ हिस्सा मिळतो.

१९. प्रस्तुत प्रकरणामध्ये मार्यान बारदेस्कर मयत झाल्यानंतर त्यांची पत्नी हयात होती किंवा नाही याबाबत वादींकडुन कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मार्यान बारदेस्कर मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यामध्ये वाटप खुले झालेले आहे. म्हणजेच प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्यामध्ये सन १९८१-८२ मध्ये वाटप झालेले आहे. वाटप झाल्यानंतर त्यांच्या वाटणीस आलेली मिळकत ही त्यांची स्वतंत्र मिळकत होते व त्यांना त्यांची मिळकत विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे.

२०. कायद्याचे कलम ३४ अन्वये जर पती/पत्नी व इतर वारस हयात नसतील तर सर्व मिळकत सरकारजमा होते. तसेच कायद्याचे कलम ३५ अन्वये विदुराचे (ज्याची पत्नी मयत झाली असेल तो इसम) हक्क सांगण्यात आलेले आहेत.

२१. कायद्याचे कलम ३६ व ३७ अन्वये फक्त अपत्ये हयात असतील तर त्यांच्यामध्ये प्रत्येकी समान हिस्सा वाटप होतो. तसेच कायद्याचे कलम ३८ अन्वये अपत्ये हयात नसतील तर नातवंडांमध्ये समान हिस्याने वाटप होते. कायद्याचे कलम ३९ अन्वये नातवंडे जिवंत नसतील तर परतवंडांमध्ये समान हिस्याने वाटप होते.

२२. कायद्याचे कलम ४० अन्वये काही अपत्ये हयात असतील व काही अपत्यांचे निधन झाले असेल तर निधन झालेल्या अपत्यांच्या वारसांना हक्क प्राप्त होतो. उदा. अ, ब, क ही मुले असुन ड व इ या मुली आहेत असे मानले तर मुले व मुलींना समान हिस्सा येईल, तसेच अ, ब, क, ड, इ पैकी कोणी मयत असेल तर त्यांच्या वारसांना त्यांना मिळत असलेला हिस्सा मिळतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ ॲगोस्टीन हा अद्याप हयात आहे. त्यामुळे त्याच्या वारसांना म्हणजेच वादी क्र.१ ते ३ यांना प्रतिवादी क्र.१ च्या हयातीत दावा मिळकती वाटप होवुन मागणेचा कायदेशिर हक्क व अधिकार नाही. तसेच तुकडे जोड व तुकडे बंदी प्राधिकरण हे सक्षमपणे वादातील खरेदीखताची तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यान्वये वैधता ठरवु शकते. वरील सर्व विवेचनावरुन न्यायालयाचे ठामपणे असे मत झालेले आहे की, सन १९८१-८२ मध्ये मार्यान बारदेस्कर याच्या निधनानंतर प्रतिवादी क्र.१ ते ५ यांच्या कुटुंबातील वाटप खुले झाल्यामुळे म्हणजेच अप्रत्यक्षरित्या सन १९८१-८२ मध्ये त्यांच्या कुटुंबातील वाटप झालेले आहे. वाटपानंतर प्रतिवादी क्र.१ ते ५ वाटप झाले असल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने करुन दिलेली खरेदीपत्रे बेकायदेशिर आहेत असे सद्य स्थितीत प्रथमदर्शनी म्हणणे योग्य होणार नाही. तसेच दावा मिळकतीत प्रथमदर्शनी वादींचा कब्जा असल्याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा नाही.

२३. वादीतर्फे विधिज्ञ यांनी आपली भिस्त मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या खाली नमुद न्यायनिर्णयावर ठेवली आहे.

Mallu Tatya Suryavanshi Versus Shripati Rama Gondhali and others [[1995]2 BomCR 544]

उपरोक्त न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती व या अर्जातील वस्तुस्थिती वेगळी असल्याने सदर न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने विचारात घेता येणार नाही.

२४. प्रतिवादी क्र.११ तर्फे विधिज्ञ यांनी आपली भिस्त मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांच्या खाली नमुद न्यायनिर्णयावर ठेवली आहे.

1] Nagrao And Ors. Vs. The Nagpur Improvement Trust And Ors. [2001(3) Mh.L.R.]

2] Mandali Ranganna Versus T. Ramachandra [2008(4)CPSC805]

उपरोक्त न्यायनिर्णयांतील वस्तुस्थिती व या अर्जातील वस्तुस्थिती वेगळी असल्याने सदर न्यायनिर्णय प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने विचारात घेता येणार नाहीत.

२५. वरील सर्व विवेचनावरुन वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस नाही. तसेच सोईचा समतोल देखील वादींच्या बाजुने नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.११ विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत झाल्यास प्रतिवादी क्र.११ चे अपरिमित असे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दाव्यातील गुंतागुंत वाढण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. परिणामतः मी प्रश्नबिंदु क्र.१ ते ३ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.04 12:46:02 +0530

स्थळ : गारगोटी.
दिनांक : ०३/११/२०२३.

**( व्ही. बी. मुल्ला )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.